जा.क्र. जि.प.मु.सा./५७/२०२२
जि.प. मुद्रणालय सातारा

जावक क्रमांक :

दिनांक : १२/१२/२०२२

## दरपत्रक नोटीस

प्रति

**विषय : दिनदर्शिका छपाईचे दरपत्रक मिळणेबाबत...**

सातारा जिल्हा परिषद मुद्रणालयास खालील तपशिलात नमुद केलेनुसार दिनदर्शिका तयार करुन घेणेचे असुन त्यासाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहुन दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | संख्या | दर प्रती नग र.रु. |
|---|---|---|---|
| १) | **दिनदर्शिका**<br>आकार : १५'' x २०''<br>६ पेजेस (पाठपोट १२ पाने)<br>१७० जीएसएम आर्ट पेपरवर पाठपोट चाररंगात छपाई<br>वरील बाजूस आडवी क्लिप आणि<br>दिनदर्शिका अडकविण्यासाठीची लेस | ५००० | |

## अटी व शर्ती

१) दरपत्रक सोबतच्या नमुन्या नुसारच सादर करावेत.

२) दरपत्रकासोबत संस्थेचा शॉप ॲक्ट रजिस्ट्रेशन दाखला / ग्रामपंचायत हद्दीत असेल तर सरपंच / ग्रामसेवक / ग्रामपंचायत यांचा दाखला, सेवा व वस्तू कर नोंदणी केली असलेबाबत प्रमाणपत्र आणि पॅन कार्ड सोबत सादर करावे.

३) विहित नमुन्यातील दरपत्रक दिनांक १९/१२/२०२२ रोजी पर्यंत दुपारी ३.०० पर्यंत समक्ष अथवा पोस्टाने पोहोच होईल अशा पद्धतीने सादर करावे. तद्नंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

४) सिलबंद दरपत्रके उघडण्याची वेळेस आपला प्रतिनिधी अथवा आपण समक्ष हजर रहाणेचे आहे. त्यानुसार आपण उपस्थित न राहिलेस कोणतीही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

५) दरपत्रकामध्ये खाडाखोड करु नये, लखोट्यावर 'दिनदर्शिका छपाईचे दरपत्रक' असा उल्लेख असावा.

६) एक किंवा सर्वच दरपत्रक स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार, तसेच अटी व शर्तीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्याचे अधिकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवलेले आहेत.

७) छपाई ही नमुन्यानुसार आणि दिलेल्या मुदतीतच होणे आवश्यक आहे. छपाई समाधानकारक न झाल्यास होणाऱ्या देयकाची अदायी होणार नाही. तसेच मुद्रणालयाच्या होणाऱ्या नुकसान भरपाईस व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ठरवतील त्यानुसार दंडास आणि कायदेशीर कारवाईस निविदाधारक पात्र ठरेल.

८) छपाईसाठी आवश्यक असणारे डिझायनींग सीडी/पेन ड्राईव्ह व नमुना मुद्रणालयातुन स्वखर्चाने घेऊन जाणेचा असुन नमुन्याप्रमाणे छपाई झाल्यानंतर स्वखर्चानेच मुद्रणालयामध्ये कार्यालयीन वेळेत व दिवशी आदेशातील विहीत मुदतीत पोहोच करावयाचा आहे. कामाच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी कामाच्या जागी कोणतीही सामुग्री आणली जाणार नाही किंवा सुपूर्द केली जाणार नाही. मुदतीत पुरवठा न केल्यास पुरवठा होणेबाबत मुद्रणालयामार्फत कोणताही पत्र व्यवहार करण्यात येणार नाही. तसेच मुदतीत पुरवठा न केल्यास महाराष्ट्र शासनाच्या दि. ०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार किंवा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा ठरवतील तो दंड आकारण्यात येईल.

९) छपाईच्या दरात वाहतुक, व छपाईच्या अनुषंगाने आवश्यक असणाऱ्या खर्चाचा समावेश असावा.

१०) छपाईच्या दरामध्ये जीएसटी किंवा इतर करांचा समावेश केला जाऊ नये तो स्वतंत्र बिलामध्ये आकारावा.

११) सशर्त दरपत्रक स्विकारली जाणार नाही.

(ज्ञानेश्वर खिलारी (भा.प्र.से.))
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद